(सर्व कायदेशीर अथवा न्यायालयीन विवादासाठी या आदेशाचा इंग्रजी अनुवाद अधिग्राह्य धरण्यात येईल.)

वनजमीन-यवतमाळ

वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत मे.रिलायन्स सिमेंटेशन प्रा. लि. यांना रिलायंस सिमेंट प्रकल्पासाठी ४६७.४५ हेक्टर राखीव "क" वर्ग वनजमीन वळती करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन आदेश क्रमांक: एफएलडी-३२११/प्र.क्र.११३/फ-१०

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक : २२/०१/२०१८

वाचा :-

१) मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.डेस्क-१७/एनसी/आय/आयडी-११९१४/१७४/११-१२, दिनांक ०२.०५.२०११.

२) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाचे पत्र समक्रमांक, दिनांक १६.०४.२०१२.

३) पर्यावरण व वन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.एफ नं. ८-२८/२०१२-एफ सी,दिनांक १९.१२.२०१२.

४) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.डेस्क-१७/एन सी/१/आयडी-११९१४/९५५/१७-१८,दिनांक १९.०७.२०१७.

५) पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. एफ नं. ८-२८/२०१२-एफ सी,दिनांक १२.०९.२०१७.

६) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.डेस्क-१७/नोसेल/आयडी-११९१४/२३४८/१७-१८,दिनांक ०३.०१.२०१८.

आदेश :-

ज्याअर्थी, मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी मे. रिलायन्स सिमेंटेशन प्रा. लि., नवी मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेला रिलायन्स सिमेंट प्रकल्पाकरीता ४६७.४५ हेक्टर राखीव वनजमीन वळती करण्याचा प्रस्ताव राज्य शासनास उपरोक्त अ.क्र.१ येथील पत्रान्वये सादर केला होता;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने संदर्भ क्रमांक २ येथील पत्रान्वये या प्रस्तावाची सविस्तर छाननी केल्यानंतर वन (संवर्धन) अधिनियम, १९८० च्या कलम-२ (ii) अन्वये ४६७.४५ हेक्टर राखीव वनजमीन वळती करण्याची भारत सरकारला शिफारस केली आहे;

आणि ज्याअर्थी, भारत सरकारने, राज्य शासनाने वन (संवर्धन), अधिनियम, १९८० च्या कलम-२ (ii) खाली सादर केलेल्या सदर प्रस्तावास वरील अ.क्र.-३ येथील पत्रान्वये तत्वत: मंजूरी दिलेली आहे;

आणि ज्याअर्थी, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी त्यांच्या वरील अ.क्र.-४ येथील पत्रान्वये तत्वत: मान्यता आदेशातील अटींचा पूर्तता अहवाल पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर केला होता;

आणि ज्याअर्थी, पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी यवतमाळ जिल्हयातील ४६७.६४ हेक्टर राखीव वनजमीन उपरोक्त प्रस्तावास काही अटींसह वरील अ.क्र.-५ येथील पत्रान्वये वळती करण्यास अंतिम मान्यता दिली आहे;

आणि ज्याअर्थी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी त्यांच्या वरील अ.क्र.-६ येथील पत्रान्वये केंद्र सरकारच्या दि.१२.०९.२०१७ रोजीच्या अंतिम मान्यता आदेशातील अटींचा पूर्तता अहवाल सादर केला आहे;

म्हणून आता महाराष्ट्र शासन याद्वारे असे निर्देश देत आहे की, प्रकल्प यंत्रणा म्हणजेच मे.रिलायन्स सिमेंटेशन प्रा. लि., नवी मुंबई यांना रिलायन्स सिमेंट प्रकल्पाकरीता खाली दिलेल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेली आणि मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे संदर्भ क्र.१ येथील पत्रानुसार सादर केलेल्या प्रकल्प प्रस्तावात अधिक तपशीलात नमूद केलेली ज्यामध्ये, राखीव वनजमिन समाविष्ट आहे, अशी एकूण ४६७.४५ हेक्टर वनजमीन या प्रस्तावासाठी वळती करण्यात यावी. सदर वळतीकरण भारत सरकारच्या दि.१९.१२.२०१२ व दि.१२.०९.२०१७ रोजीच्या पत्रातील अटी व शर्तींच्या पूर्ततेच्या अधीन राहून तसेच खालील अटींच्या पूर्ततेनंतर पूर्ण करण्यात यावे;

१. वर नमूद केलेल्या भारत सरकारच्या तत्वत: मान्यता व अंतिम मान्यतेच्या पत्रातील विहित केलेल्या सर्व अटींचे प्रकल्प यंत्रणा अनुपालन करेल याची मुख्य वनसंरक्षक (प्रा.), यवतमाळ खात्री करतील. मुख्य वनसंरक्षक (प्रा.), यवतमाळ याबाबतचा अहवाल वेळोवेळी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना सादर करतील.
२. वन (संवर्धन) अधिनियम, १९८० व त्याअंतर्गत केलेले नियम आणि मार्गदर्शक सूचना, भारत सरकारच्या दि.१९.१२.२०१२ व दि.१२.०९.२०१७ रोजीच्या पत्रातील अटी आणि या आदेशातील अटींपैकी कोणत्याही अटींचे अनुपालन न करणे हे वन (संवर्धन) अधिनियम, १९८० चा भंग ठरेल आणि त्याप्रमाणे याबाबत वैधानिक कारवाई करण्यात येईल.

उपरोक्त अटींपैकी कोणत्याही अटींचे अनुपालन न केल्यास (non-compliance) संबंधित मुख्य वनसंरक्षक/उपवनसंरक्षक, वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत दि.२५.१०.१९९२ रोजी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनातील कलम १.९ नुसार अहवाल राज्य शासनामार्फत पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नागपूर यांना सादर करतील.

अनुसूची

<table>
<tr><th>गावाचे नाव</th><th>तालुका</th><th>जिल्हा</th><th>कक्ष क्र./
गट नंबर</th><th>वैधानिक दर्जा</th><th>क्षेत्रफळ
(हेक्टर मध्ये)</th></tr>
<tr><td>पिंप्रडवाडी</td><td rowspan="3">झरीजामणी</td><td rowspan="3">यवतमाळ</td><td>कक्ष क्र. ३३
गट नं.
२,३,४,५,६,७,८,९,१०,
११,१२,१३,१४,१५</td><td rowspan="3">राखीव वन
(क-वर्ग)</td><td>२५७.४५</td></tr>
<tr><td>हिरापूर</td><td>कक्ष क्र. २६
गट नं. १७०</td><td>१३०.००</td></tr>
<tr><td>गोविंदपूर</td><td>कक्ष क्र. २७
गट नं. १</td><td>८०.००</td></tr>
<tr><td colspan="5">एकूण क्षेत्रफळ (हेक्टर मध्ये)</td><td>४६७.४५</td></tr>
</table>

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१२२१३३६१८७७१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Virendra R Tiwari

Digitally signed by Virendra R Tiwari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a95e1a9759002ee190cd79464daaba7dc840ec375cd62a646a64986631086810, cn=Virendra R Tiwari
Date: 2018.01.22 13:43:23 +05'30'

(वीरेन्द्र तिवारी)
मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)

प्रत:-टप्पा-१ व टप्पा-२ च्या मंजुरी आदेशासह वरील आदेश आपल्या वेबसाईटवर अपलोड करण्याच्या विनंतीसह :

१. सचिव, पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.

२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (केंद्रीय), पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, क्षेत्रिय कार्यालय, पश्चिम-मध्य क्षेत्र, भारत सरकार, नागपूर.

प्रत :-

१. अपर मुख्य सचिव (उद्योग), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
५. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
६. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कॅम्पा), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
७. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संधारण), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
८. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती.
९. मुख्य वनसंरक्षक (वन संवर्धन), नागपूर.
१०. मुख्य वनसंरक्षक (प्रा.), यवतमाळ.
११. जिल्हाधिकारी, यवतमाळ.
१२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ.
१३. उप वनसंरक्षक, पांढरकवडा वन विभाग.
१४. अतिरिक्त उपाध्यक्ष (कच्चा माल) रिलायन्स सिमेंटेशन प्रा. लि., नवी मुंबई.
१५. निवडनस्ती (फ-१०).

२. जिल्हाधिकारी-यवतमाळ, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद-यवतमाळ व उप वनसंरक्षक, पांढरकवडा वन विभाग यांना निर्देशित करण्यात येते की, वरील आदेशाची प्रत स्थानिक संस्था, पंचायत, नगरपालिका, नगरपरिषद आणि संबंधित शासकीय कार्यालयांचे प्रमुख यांना पाठविण्यात यावी. तसेच त्यांनी वरील आदेश त्यांच्या कार्यालयातील सूचना फलकावर तसेच वरील कार्यालय प्रमुखांच्या सूचना फलकावर सर्वसामान्य जनतेच्या माहितीसाठी प्रदर्शिले जातील याची खात्री करावी.

३. अतिरिक्त उपाध्यक्ष (कच्चा माल), मे. रिलायन्स सिमेंटेशन प्रा. लि., नवी मुंबई यांना निर्देशित करण्यात येते की, वन मंजुऱ्यांचे सर्व आदेश, सर्व्हे क्र., गट क्र. त्यांचे प्रत्येकाचे क्षेत्र आणि वैधानिक दर्जा इ. सह आणि केंद्र शासनाने मान्यतेच्या आदेशात घातलेल्या अटी व संरक्षित बाबी यांच्यासह एक स्थानिक भाषेतील व एक इंग्रजी भाषेतील प्रसिध्द अशा दोन दैनिक वृत्तपत्रात प्रसारित करावेत, व त्याची प्रत मुख्य वनसंरक्षक (प्रा.), यवतमाळ व उपवनसंरक्षक, पांढरकवडा वन विभाग यांना पाठवावी.

४. स्थानिक स्वराज्य संस्था, पंचायत, नगरपालिका, नगरपरिषद आणि संबंधित शासकीय कार्यालयांचे प्रमुख यांना निर्देशित करण्यात येते की, आदेशांची प्रत मिळाल्यापासून ३० दिवसापर्यंत सदर आदेश सूचना फलकावर प्रदर्शित करावे.

Forest Land- Yavatmal
Diversion of 467.45 ha. of Reserved “C” Class Forest land under Forest (Conservation) Act, 1980 in favour of M/s. Reliance Cementation Pvt. Ltd. for Reliance Cement Project.

Government of Maharashtra

Revenue and Forest Department

Government Order No. FLD-3211/C.R.-113/F-10

Mantralaya, Mumbai - 400032.

Date: 22/01/2018

Read :-

1) Letter from Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur, No.Desk-17/NC/I/ID-11914/174/11-12, dated 02.05.2011.
2) Letter from Government of Maharashtra of even No. dated 16.04.2012.
3) Letter from Ministry of Environment & Forests, Government of India, New Delhi No.F.No. 8-28/2012-FC, dated 19.12.2012.
4) Letter from Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur, No. Desk-17/NC/1/ID-11914/955/17-18, dated 19.07.2017.
5) Letter from Ministry of Environment, Forests & Climate Change, Regional Office, Government of India, New Delhi No.F.No.8-28/2012-FC, dated 12.09.2017.
6) Letter from Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur, No. Desk-17/Nocel/1/ID-11914/2348/17-18, dated 03.01.2018.

Order:-

Whereas, the Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur, vide his letter referred at serial number 1 above has submitted a proposal to the State Government, which has been received from Additional Vice President (Raw Materials), M/s.Reliance Cementation Pvt. Ltd. Navi Mumbai for diversion of 467.45 ha. of Reserved Forest land for Reliance Cement Project;

AND whereas, Government of Maharashtra, vide letter referred at serial number 2 above after careful scrutiny and consideration, has recommended it to the Government of India to divert the 467.45 ha. of Reserved Forest land for the above project under section 2 (ii) of Forest (Conservation) Act, 1980;

AND whereas, Government of India after due consideration, vide its letter referred at serial number 3 above granted in-principle approval to above proposal submitted by Government of Maharashtra for diversion of forest land under section 2 (ii) of Forest (Conservation) Act, 1980.

AND whereas, The Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur, vide its letter referred at serial number 4 above has submitted compliance of those conditions to the Ministry of Environment, Forests & Climate Change, Government of India, New Delhi;

AND whereas, Ministry of Environment, Forests & Climate Change, Government of India, New Delhi vide its letter referred at serial number 5 above has accorded formal approval under section 2 (ii) of Forest (Conservation) Act, 1980, for the diversion of 467.64 ha. of Reserved Forest land for Reliance Cement Project;

AND whereas, the Additional Principal Chief Conservator of forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur vide his letter referred at sr. no. 6 above has conveyed that User Agency has complied with all the conditions stipulated in Ministry of Environment, Forests & Climate Change, Government of India, New Delhi's letter of final approval dtd. 12.09.2017

NOW, therefore, Government of Maharashtra hereby directs that the forest land area of 467.45 ha. consisting of Reserved Forest land more specifically described in the proposal submitted, vide letter mentioned at serial number 1 here in above from Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur and as per details given in the Schedule given below, be diverted to the User Agency, i.e. M/s. Reliance Cementation Pvt. Ltd. Navi Mumbai. The diversion shall be effected subject to the terms and conditions mentioned in the letters dated 19.12.2012 & dated 12.09.2017 of Government of India. This approval for diversion of forest land is also subject to compliance of following conditions by the User Agency-

1. The User Agency shall comply with all the conditions stipulated in the in-principle and final approval letters of Government of India, referred above. The Chief Conservator of Forests (Territorial), Yavatmal shall ensure the strict compliance of the conditions by the User Agency. CCF will furnish the report in this regard to Additional Principal Chief Conservator of Forests and Nodal Officer, Maharashtra State, Nagpur from time to time.
2. Non-compliance of any of the conditions mentioned in Government of India's letters dated 19.12.2012 & dated 12.09.2017, in this order and Rules and Guidelines made / issued under Forest (Conservation) Act, 1980, shall amount to violation of Forest (Conservation) Act, 1980 and action would be taken accordingly.
3. In case of non-compliance of any of the above conditions, the concerned Chief Conservator of Forests/Deputy Conservator of Forests shall report through the State Government to Ministry of Environment, Forests & Climate Change, Government of India as per procedure laid down in the clause 1.9 of guidelines on 25.10.1992 under the Forest (Conservation) Act, 1980.

SCHEDULE

Village Name	Tehsil	District	Compt. No. / Gut No.	Status of Forest Land	Area (in Ha.)
Pimparadwadi	Zarijamni	Yavatmal	Compt. No. 33 Gut No. 2,3,4,5,6,7,8,9, 10,11,12,13,14,15	Reserved Fprest (C-Class)	257.45
Hirapur			Compt. No. 26 Gut No. 170		130.00
Govindpur			Compt. No. 27 Gut No. 1		80.00
Total (in ha.)					**467.45**

This Government Order is available on www.maharashtra.gov.in with Reference no. 201801221336187719. This order has been signed digitally.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

Virendra R Tiwari

Digitally signed by Virendra R Tiwari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a95e1a9759002ee190cd79464daaba7dc840ec375cd62a646a64986631086810, cn=Virendra R Tiwari
Date: 2018.01.22 13:43:41 +05'30'

(Virendra Tiwari)

Chief Conservator of Forests (Mantralaya)

Copy forwarded with request to upload this order on their website along with the Stage-I and Stage-II clearances to:

1. Secretary, Ministry of Environment, Forests & Climate Change, Government of India, New Delhi.
2. Additional Principal Chief Conservator of Forests (Central), Ministry of Environment, Forests & Climate Change, Regional Office, West-Central Zone, Government of India, , Nagpur.

Copy to :-

1. Additional Chief Secretary (Industries), Industry, Energy & Labour Department, Mantralaya, Mumbai.
2. Secretary, Tribal Development Department, Mantralaya, Mumbai.
3. Principal Chief Conservator of Forests (HoFF), Maharashtra State, Nagpur.
4. Principal Chief Conservator of Forests (Wildlife), Maharashtra State, Nagpur.
5. Additional Principal Chief Conservator of Forests and Nodal Officer, Maharashtra State, Nagpur.
6. Additional Principal Chief Conservator of Forests (CAMPA), Maharashtra State, Nagpur.
7. Additional Principal Chief Conservator of Forests (Conservation), Maharashtra State, Nagpur.
8. Divisional Commissioner, Amravati Division, Amravati.
9. Chief Conservator of Forests (Forest Conservation), Nagpur.
10. Chief Conservator of Forests (Territorial), Yavatmal.
11. Collector, Yavatmal.
12. Chief Executive Officer, Zilha Parishad, Yavatmal.
13. Deputy Conservator of Forests, Pandharkawada Forest Division, Yavatmal.
14. Additional Vice President (Raw Materials) Reliance Cementation Pvt. Ltd. Navi Mumbai.
15. Select File, Desk F-10.

2. Collector, Yavatmal, Chief Executive Officer, Zilha Parishad, Yavatmal and Deputy Conservator of Forests, Pandharkawada Forest Division are hereby directed to forward the copy of this order to concerned Heads of Local Bodies, Panchayats, Municipal Bodies in addition to the relevant offices of the Government and they shall also ensure the display of this order on their notice board as well as on the notice board of local self-government bodies for the information of general public.

3. Additional Vice President (Raw Materials) Reliance Cementation Pvt. Ltd. Navi Mumbai is hereby directed that he should publish the entire order of forest clearances granted in verbatim along with the details of Survey No., Gut No., area and legal status of each Survey, Gut No. etc. and along with the conditions and safe guards imposed by the Central Government while granting forest clearances in two widely circulated daily newspapers, one in vernacular language and other in English language. Copy of the Newspapers be submitted to Chief Conservator of Forests (Territorial), Yavatmal & Deputy Conservator of Forests, Pandharkawada Forest Division.

4. Heads of Local Bodies, Panchayats and Municipal Bodies in addition to the relevant offices of the Government are hereby directed to display the same on their notice board for 30 days from the date of receipt for the information of general public.